# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी क्र.** (०२२) २२१६ ३९६४/६५/६९ **फॅक्स :** (०२२) २२१६ ३९७६

**मविनिआ** **ई-मेल : mercindia@mercindia.org.in • वेबसाईट : www.mercindia.org.in**


# जाहीर सूचना

**१२ जानेवारी २०११**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ या दोन्ही प्रारुपावर हितसंबंधितांकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत.**

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०११ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनिमय, २०११ चे प्रारुप आयोगाने तयार केले आहेत.

यापूर्वीचे विनियम म्हणजेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनिमय, २००५ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश), विनियम, २००५ ला प्रस्तावित विनियम अधिक्रमित करतील.

आयोगाने, वरील दोन्ही प्रारुप विनियम त्याच्या **www.mercindia.org.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात ठेवलेले आहेत.

वरील दोन्ही प्रारुप विनियमांवर, आयोग, जनता, वितरण परवानाधारक आणि अन्य हितसंबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवीत आहे, या सूचना आणि हरकती (१+५ प्रतींमध्ये) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्सने किंवा ई-मेलद्वारा **mercindia@mercindia.org.in** या पत्त्यावर **दि. ११ फेब्रुवारी २०११** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

दि. ११ फेब्रुवारी, २०११ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

सही/-

दिनांक : १२ जानेवारी, २०११ **(के. एन. खवारे)**

ठिकाण : मुंबई सचिव, मविनिआ